संदर्भ:- १) सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.:सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३/अकरा,दि.१२.१०.१९९३
२) सामान्य प्रशासन विभाग शा.नि क्रमांक-अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ. मुंबई,दिनांक १७.०७.२०२५
३) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ अधिसुचना, दिनांक ११.०६.२०१३
४) शासन निर्णय क्रमांक-अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ,दिनांक.२१.०९.२०१७
५) वित्त विभाग, मंत्रालय यांचे पत्र क्र.विकअ-१०१८/प्र.क्र-११५/विप्र-१ दि.०४.०९.२०१८

विशेष राज्यकर आयुक्तांचे कार्यालय,
३ रा मजला, एच विंग, नविन इमारत,
वस्तू व सेवा कर भवन, माझगांव,
मुंबई-४०० ०१०.

# *आदेश*

क्रमांक: सराआ/आस्था-५/कस-१/२०२५/अकंपा नियुक्ती/उमे.०७/ब- 1001 मुंबई, दिनांक:- 1 OCT 2025

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयाच्या अनुषंगाने पुढील आदेश निर्गमित करण्यात येईपर्यंत परिशिष्ट-अ मधील नमुद उमेदवारांच्या त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून, नामनिर्देशनाने, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अनुकंपा तत्वावर कर सहायक या पदावर नियुक्ती करण्यात येत आहे. सदर उमेदवाराला हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत (३० दिवस) नियुक्ती स्विकारणे अनिवार्य आहे. शिवाय प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत काही कळविले नाही, तर त्यांचे नाव कोणतीही पूर्वसूचना न देता निवड यादीवरुन काढून टाकण्यात येईल. सदर नियुक्त्या खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत.

१. अ) या कर सहायकांचे वेतन मॅट्रिक्स मधील वेतनस्तर S-८ रुपये रु २५५००-८११०० असे राहील.
   ब) या वेतन बँड व्यतिरीक्त शासन वेळोवेळी ठरवील त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील.
२. कर सहायक पदावरील नियुक्ती वैद्यकीय तपासणीच्या व पोलीस पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. पदावर रुजू होताच सदर उमेदवारास तात्काळ वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल. सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याने वैद्यकीय दृष्टया कर सहायक पदासाठी जर उमेदवारास अयोग्य ठरविले तर, सदर उमेदवारांची नियुक्ती संपुष्टात आणण्याचे अधिकार वस्तू व सेवाकर विभागाने राखून ठेवले आहेत आणि त्या प्रसंगी सदर उमेदवार रुजू झाल्याच्या दिनांकापासून नेमणूक संपुष्टात आणण्याच्या दिनांकापर्यंत सदर उमेदवारास दिली गेलेली वेतनाची रक्कम विभागास परत घेण्याचा अथवा वेतनाची देय असलेली रक्कम वस्तू व सेवाकर विभागाकडे राखून ठेवण्याचा हक्क विभागास असेल.
३. पदावर रुजु झाल्यानंतर संबंधीत उमेदवाराने साक्षांकन नमुन्याची एक प्रत संबंधीत आस्थापना अधिकारी यांचेकडे जमा करावी व संबंधीत आस्थापना अधिकारी यांनी सदर उमेदवाराच्या पोलिस पडताळणीची कार्यवाही आपल्या कार्यालयाच्या स्तरावर पार पाडावी व तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास पाठवावा. पोलिस पडताळणी अहवालाद्वारे उमेदवारावर कुठल्याही प्रकारचा गुन्हा दाखल असल्याचे आढळुन आल्यास, सदर उमेदवारांची नियुक्ती संपुष्टात आणण्याचे अधिकार वस्तू व सेवाकर विभागाने राखून ठेवले आहेत आणि त्या प्रसंगी सदर उमेदवार रुजू झाल्याच्या दिनांकापासून नेमणूक संपुष्टात आणण्याच्या दिनांकापर्यंत सदर उमेदवारास दिली गेलेली वेतनाची रक्कम विभागास परत घेण्याचा अथवा वेतनाची देय असलेली रक्कम वस्तू व सेवाकर विभागाकडे राखून ठेवण्याचा हक्क विभागास असेल.
४. सदर उमेदवारांनी सांविधिक विद्यापिठाची पदवी किंवा शासनाने तिच्याशी समकक्ष केलेली अर्हता प्राप्त केली आहे अशी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे मुळ प्रमाणपत्र नियुक्तीचे वेळी कार्यालयास सादर करणे आवश्यक

आहे. सदर मुळ प्रमाणपत्राच्या वैधता पडताळणीच्या अधिन राहून सदर उमेदवाराला तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे.

५. कर सहायक पदावर शिफारस झाल्यामुळे रुजू होण्यासाठी हजर राहते वेळी संबंधीत उमेदवाराला परिशिष्ट-ब मधील हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा, उमेदवारास कर सहायक पदावर हजर करुन घेण्यात येणार नाही. तसे सदर हमीपत्र समाधानकारक नसल्यामुळे स्विकारार्ह नसेल तर उमेदवारास हमीपत्र पुन्हा सादर करावे लागेल.

६. मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदावर उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यास अशा उमेदवारांबाबत, संबंधित उमेदवारांनी त्यांच्या जाती किंवा जमाती बाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले विहीत नमुन्यात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (यासंदर्भात कार्यालयाचे लक्ष शासन निर्णय सा.न्या.,सां.का,क्रि व वि.स.विभाग क्र.सीबीसी-१०/२००३/प्र.क्र.९१/मावक-५,दि.०८.१२.२००३, शा.नि.सा सां.का,क्रि व वि.स.विभाग क्र.सीबीसी१०/२००३/प्र.क्र.९१/मावक-५,दि.२८.०१.२००४,सा.न्या.,सां.का,क्रि व वि.स.विभाग क्र.सीबीसी-१०/२००३/प्र.क्र.९१/मावक-५,दि.०६.०२.२००४ कडे वेधण्यात येत आहे) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय,क्र:बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ब, दि.१२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून उमेदवाराची नियुक्ती प्रस्तुत राखीव प्रवर्गातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे. मागासवर्गातील उमेदवारांनी केलेले जाती किंवा जमातीविषयक दावे अवैध ठरल्यास त्यास त्यांच्या सेवेमध्ये जातीबाबतचे फायदे देय होणार नाहीत व सदर उमेदवार खुल्या प्रवर्गातील असल्याचे समजले जाईल.

७. कर सहायक या पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारास कर सहायकांसाठी विहित केलेली विभागीय परीक्षा, त्या संबंधी केलेल्या नियमातील तरतूदीनुसार उत्तीर्ण होण्यातून त्याला/तिला सुट मिळाली नसल्यास सदर कर सहायक वर्गीय सेवा प्रवेशोत्तर विभागीय परीक्षा,विहित मुदतीत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे, अन्यथा त्यांची सेवा ज्येष्ठता गमावण्यात येईल व त्यांची वेतन वाढ रोखण्यात येईल तसेच त्यांचा पुढील पदोन्नतीकरीता विचार करता येणार नाही.

८. कर सहायक पदावर नियुक्ती झालेल्या व्यक्तीस जर तो/ती अगोदरच उत्तीर्ण झाला नसेल किंवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर त्याला/तिला हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. विहित मुदतीत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास कर सहायक या पदावरील सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

९. कर सहायक पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवाराने महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या संगणक हाताळणीचे प्रमाणपत्र, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रशिक्षण२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई, अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती स्विकारण्याच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील. तथापि, नियुक्ती स्विकारण्याच्या वेळी उमेदवारांकडे सदर प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास नियुक्ती स्विकारल्यापासून २ वर्षांच्या आत संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. या कालावधीत सदर प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या उमेदवारांची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१०. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय, क्र.अकंपा१०४/प्र.क्र.१६४/आठ,दि.२०.०५.२०१५ नुसार कर सहायक पदावर अनुकंपातत्वावर नियुक्ती होणाऱ्या उमेदवारांनासुध्दा इंग्रजी ४० श.प्र.मि. व मराठी ३० श.प्र.मि अर्हतेचे टंकलेखनाचे विहीत प्रमाणपत्र सादर करण्यासाठी नियुक्ती पासुन २ वर्ष इतकी मुदत राहिल. नियुक्ती स्विकारण्याच्या वेळी उमेदवारांकडे सदर प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास नियुक्ती स्विकारल्यापासून २ वर्षाच्या आत इंग्रजी ४० श.प्र.मि. व मराठी ३० श.प्र.मि अर्हतेचे टंकलेखनाचे विहीत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल. या कालावधीत सदर प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या उमेदवारंची सेवा कोणतीही पुर्वसूचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

११. या कर सहायकांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो१००५/१२६/सेवा-४ दि.३१.१०.२००५ नुसार नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन

योजना (म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१२. कर सहायक या पदावर नियुक्ती केलेला उमेदवार हा महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होणेस पात्र राहील.

१३. या कर सहायकांची ज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली,२०२१ नुसार निश्चित करण्यात येईल.

१४. जर उमेदवार शासन सेवेतील कर सहायक या पदावरील नेमणूकीसाठी सदर पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीप्रमाणे पात्र नव्हता अथवा विहित अर्हता प्राप्त नव्हता अथवा त्यांनी नेमणूक मिळविण्यासाठी खोटी माहिती दिली होती अथवा खोटे प्रमाणपत्र सादर केले होते, असे नंतर आढळून आले, तर अशा उमेदवारांच्या सेवा सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३ अकरा, दि. १२/१०/१९९३ मधील तरतूदीनुसार समाप्त करण्यात येतील.

१५. सदर कर सहायकाला नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवास भत्ता देय असणार नाही.

१६. सदर नियुक्ती शासनाच्या वेळोवेळी पारित होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१७. परिशिष्ट -अ च्या स्तंभ -२ मधील उमेदवारांची नियुक्ती पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत करण्यात आली असुन त्यांची सेवा समाप्ती कोणतीही पुर्व सुचना न देता करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच त्यांना सेवेचे त्यागपत्र द्यावयाचे असल्यास त्या बाबतची लेखी सुचना एक महिना आगाऊ या कार्यालयास देणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांच्या कडुन एक महिन्याच्या मुळ वेतनाएवढी रक्कम वसुल केली जाईल.

१८. **परिशिष्ट -अ च्या स्तंभ-२ मधील उमेदवारांनी हे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत (३० दिवस) मा. विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, आस्था-५, तिसरा मजला, वस्तू व सेवाकर भवन, माझगाव, मुंबई-४०००१० येथे हजर होणे आवश्यक आहे.**

१९. सदर कार्यालयामार्फत त्यांचे मुळ कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतरच परिशिष्ट-अ मधील स्तंभ क्र.५ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात कर सहायक या पदावर रुजु करून घेतले जाईल.

२०.**परिशिष्ट-अ मधील उमेदवारांची नियुक्ती अपर राज्यकर आयुक्त, ठाणे क्षेत्र, ठाणे असे नमुद असले तरी उमेदवारांची अनुकंपा तत्वावर मुळ शिफारस ज्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाली असेल त्या जिल्ह्यातील वस्तु व सेवाकर विभागातील जागेची रिक्तता लक्षात घेवुन सदर जिल्ह्यात संबंधित उमेदवाराला नियुक्ती देण्याबाबतच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही अपर राज्यकर आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात यावी.**

**(मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने.)**

**(संजय निकम)**
**राज्यकर सहआयुक्त, (मुख्यालय-४)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**सहपत्रे** -परिशिष्ट - **अ व ब**

प्रत सादर:-

१. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई....
२. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अपर राज्यकर आयुक्त, ठाणे क्षेत्र, ठाणे.
४. संबधित उमेदवार
५. स्थळप्रत

## परिशिष्ट - अ

क्रमांक: सराआ/आस्था-५/कस-१/२०२५/अकंपा नियुक्ती/उमे.०७/ब- 1001 मुंबई, दिनांक: 1 OCT 2025

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा मूळ प्रवर्ग | उमेदवाराचा निवडीचा प्रवर्ग | नियुक्तीचे कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्रीम. स्वप्नाली राजेंद्र अहिरे | अ.जा | अ.जा | अपर राज्यकर आयुक्त, ठाणे क्षेत्र, ठाणे |
| २. | श्री. सुयोग गजानन पवार | अ.जा | अ.जा | अपर राज्यकर आयुक्त, ठाणे क्षेत्र, ठाणे |
| ३. | श्रीम. दर्शना प्रमोद पवार | अ.जा | अ.जा | अपर राज्यकर आयुक्त, ठाणे क्षेत्र, ठाणे |
| ४. | श्री. निलेश दिपक घोरपडे | अ.जा | अ.जा | अपर राज्यकर आयुक्त, ठाणे क्षेत्र, ठाणे |
| ५. | श्री. मयुर किशोर पाटील | इ.मा.व | इ.मा.व | अपर राज्यकर आयुक्त, ठाणे क्षेत्र, ठाणे |
| ६. | श्री. ऋषिकेश दिनेश पष्टे | इ.मा.व | इ.मा.व | अपर राज्यकर आयुक्त, ठाणे क्षेत्र, ठाणे |
| ७. | श्रीम. दक्षता राजेंद्र पाटील | इ.मा.व | इ.मा.व | अपर राज्यकर आयुक्त, ठाणे क्षेत्र, ठाणे |

**(मा. विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने.)**

(संजय निर्कम)
**राज्यकर सहआयुक्त, (मुख्यालय-४)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

C:\Users\HP\Desktop\ANUKAMPA-2025\anukmpa order dated 01.10.2025\ANUKAMPA ORDER 2025 -THANE.docx

## परिशिष्ट -ब

## हमीपत्र

मी श्री/श्रीमती/कु.------------------------------------------------- घोषित करतो /करते की, कर सहायक या पदावर अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी वस्तू व सेवाकर विभागास सादर केलेली कागदपत्रे चुकीची असल्यास व भविष्यात चुकीची माहिती आढळून आल्यास माझी कर सहायक पदावरील नेमणुक कोणत्याही टप्प्यावर रद्द केल्यास माझी काहीही हरकत असणार नाही. तसेच वस्तू व सेवाकर विभागाकडुन करण्यात येणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीस मी पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

**ठिकाण:-**

**दिनांक:-** **उमेदवाराचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी**

## हमीपत्र

मी श्री/श्रीमती/कु.-------------------------------------------------------------------घोषित करतो /करते की, माझी कर सहायक या पदी अनुकंपा तत्वावर निवड झाली आहे. माझी नेमणूक वस्तू व सेवाकर विभागाने वैद्यकिय चाचणी व पोलीस पडताळणीच्या अधिन राहून केलेली आहे. हे मला माहित व मान्य आहे. जर पोलीस पडताळणी व वैद्यकिय चाचणीच्या अहवालामध्ये विसंगती आढळल्यास माझी नेमणूक रद्द होईल याची मला जाणीव आहे. तशी पूर्व सूचना मला मिळाली आहे. तसेच वस्तू व सेवाकर विभागातील नियुक्ती मिळण्यासंबंधातील कोणतेही फायदे घेण्यास मी पात्र राहणार नाही.

**ठिकाण:-**

**दिनांक:-** **उमेदवाराचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी**

## उमेदवाराचा रुजु अहवाल

## नियुक्ती झालेल्या उमेदवाराने त्यास नियुक्ती दिलेल्या कार्यालयात रुजु झाल्याबाबतचा अहवाल

उमेदवाराचे नांव:-

भ्रमणध्वनी क्रमांक:-

प्रति,
मा. सहाय्यक राज्यकर आयुक्त
आस्थापना-५, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३ रा मजला, एच विंग, वस्तू व सेवाकर भवन
माझगांव, मुंबई ४०० ०१०.

महोदय,

मी खाली सही करणार श्री./श्रीम./कु. ---------------------------------------------- नमुद करतो/करते की,

आपले आदेश क्र. -------------------------------------------------------------------------------------------

दि. ........................रोजीचे पत्र मला मिळाले. त्यानुसार मी ----------------------------------------------- या विभाग/कार्यालयात कर सहायक या पदावर दिनांक --------------- रोजी रुजु झालो/झाले आहे. हे आपणांस माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

आपला/आपली,

उमेदवाराचे नांव व सही

उमेदवारास नियुक्ती दिलेल्या कार्यालयाचे अभिवेदन*(खालील तळटीप पहावी)

कळविण्यात येते की,श्री./श्रीम./कुमा.-------------------------------------- हे उमेदवार दि. -------------- रोजी कर सहायक या पदावर रुजु झालेले आहेत. संबंधीत उमेदवारांच्या ओळखपत्राची पडताळणी करण्यात आलेली असुन त्यांना कर सहायक या पदावर हजर करुन घेण्यात आलेले आहे.

आस्थापना अधिकाऱ्यांची स्वाक्षरी व शिक्का

तळटीप:- १. उमेदवाराने नियुक्ती दिलेल्या विभाग/कार्यालयात रुजु झाल्यानंतर वरील पत्र तात्काळ या विभागास सादर करावे अन्यथा त्यांना दिलेली नियुक्ती त्यांनी स्वीकारली नाही असे समजुन योग्य ती पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.